# प्रेसनोट

दि. ०४/०३/२०२४

**राजगुरुनगर तलाठी कार्यालय, ता. खेड, जि. पुणे येथील तलाठीवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३७ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | बबन कारभारी लंघे, वय ४६ वर्ष, पद – तलाठी, राजगुरुनगर तलाठी कार्यालय, ता. खेड, जि. पुणे (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १५,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | २,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,०००/- रुपये (दोन हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | ०२/०२/२०२४, २१/०२/२०२४, ०४/०३/२०२४ |
| सापळा दिनांक | ०४/०३/२०२४ |

ठिकाण :- राजगुरुनगर तलाठी कार्यालय, ता. खेड, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार व त्यांच्या मित्राची पत्नी असे दोघांचे भागीदारीमध्ये एक गुंठा क्षेत्र सामाईकमध्ये खरेदी केले असून, त्याची नोंदणी करुन सात-बारा उतारा देणेकरीता लोकसेवक बबन लंघे यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक बबन लंघे यांनी तक्रारदार यांचेकडे सात-बारा उता-यावर नोंद करुन, उतारा देणे करीता तडजोडीअंती २,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन, आज दि. ०४/०३/२०२४ रोजी लोकसेवक बबन लंघे यानी तक्रारदार यांचेकडून रक्कम रुपये २,०००/- (दोन हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रणेता सांगोलकर तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४

२) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३

३) व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३

४) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००

५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**

६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**

७) ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.